MHRG120002492015 नियमीत दिवाणी दावा क्र.३६/२०१५

शकुंतला वि. अवधुत वगैरे १९

## <u>निशाणी क्र. ११७ कडील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज वादीने मयत दिगंबर याची पत्नी दिपाली दिगंबर गोसावी हिस प्रतिवादी क्र. २१ म्हणून दाव्यामध्ये समाविष्ट करण्यासाठी आणि त्यानुसार वादपत्राच्या सरनाम्यामध्ये आणि वंशावळीमध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, अनावधानाने मयत दिगंबर याची पत्नी श्रीमती दिपाली दिगंबर गोसावी हिस दाव्यामध्ये पक्षकार करण्याचे राहून गेले. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची मागणी केली आहे. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी प्रस्तूत अर्ज मंजूर करण्यास नाहरकत दर्शवली. प्रतिवादी क्र. १० ते १३, १४/१, १४/२, १५, १७ ते २० आपले म्हणणे दाखल केले नसल्यामुळे अर्ज त्यांच्या म्हणण्याविना पुढे चालविण्यात आला. वादी व प्रतिवादी यांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वाटप करून मिळण्यासाठी दाखल करण्यात आला असून दाव्याचा निकाल गुणावगुणावर लागण्यासाठी दाव्यामध्ये संबंधित सर्व व्यक्तीना समाविष्ट करणे आवश्यक असल्याच्या मतास मी पोहोचलो आहे. करिता मी खालील आदेश पारित करतो -

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने प्रस्तूत आदेशापासून १४ दिवसाच्या आत वाद पत्रामध्ये प्रस्तावित प्रतिवादीस समाविष्ट करुन दुरुस्ती वाद पत्र सादर करावे.

३. पक्षकारांनी अर्जाचा खर्च आपापला सोसावा.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

सही/-

(सं. गं. सरोदे)

दिनांक : ०७/०२/२०२४ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरूड